वैशिष्ट्यपूर्ण"योजनेअंतर्गतनगरपरिषदांना निधी मंजूर करण्याबाबत.

सन २०२३-२४लेखाशिर्ष (४२१७०६०३) अंतर्गत वडूज नगरपंचायत, जि. सातारा करीता रक्कम रु.०.३० कोटी

म्हसवड नगरपरिषद जि. सातारा करिता रक्कम रु.०.१० कोटी

फलटण नगरपरिषद जि. सातारा करिता रक्कम रु.४.३०कोटी

(एकुण रक्कम रु.४.७० कोटी)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२३/प्र.क्र.३२७(३०)/भाग-१/नवि-१६**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- २९ डिसेंबर,२०२३**

**संदर्भ :-**

(१) नगरविकासविभाग, शासन निर्णय क्रमांक:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दि. १७ नोव्हेंबर,२०१७ व दि. ३० सप्टेंबर, २०२०

(२) वित्त विभाग,शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३,दि.१२ एप्रिल,२०२३

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्रमांक (१) व (२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत.सदर शासन निर्णयांच्या अनुषंगाने, **"वैशिष्ट्यपूर्ण"** या योजनेअंतर्गत राज्यातील नगर परिषद / नगर पंचायतींना निधी व कामे मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**"नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान"** या योजतेअंतर्गत **(अ) वडूज नगरपंचायत करीता रक्कम रु.०.३० कोटी (ब) म्हसवड नगरपरिषद करिता रक्कम रु.०.१० कोटी (क) फलटण नगरपरिषद करिता रक्कम रु.४.३०कोटी असे एकुण रक्कम रु.४,७०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. चार कोटी सत्तर लक्ष मात्र)** इतका निधी **सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील कामांकरीता मंजूर** करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

**२.** सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना एकत्रित प्रकल्प खर्चाच्यामर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक मान्यता प्राप्त झाली असल्याची खातरजमा संबंधित जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी व संदर्भाधीन क्र. (२) येथील शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी.

**३.** सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील कामांची कार्यान्वयन यंत्रणा संबंधित **"नगरपरिषद / नगरपंचायत"** राहील.

**४.** सदर शासन निर्णयानुसार प्रत्येक कामाच्या रक्कम रु. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीस मान्यता देण्यात आली आहे. सबब, तांत्रिक मान्यता दिलेल्या प्रत्येक कामाच्या रक्कम

रू. १०.०० लक्ष अथवा त्यापेक्षा जास्त किमतीच्या प्रत्येक कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात करण्यात यावी. एखाद्या कामाची तांत्रिक मान्यता कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) असल्यास सदर कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची (Package) ई-निविदा करणे अपेक्षित आहे. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या (Package) रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या "ई-निविदा" अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरुपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. <u>जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे."ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे. तसेच दर सहा महिन्यांनी जिल्ह्यांतर्गत या योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांचा आढावा घेणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे व निधी आहरीत करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.अशी बाब असल्यास सदरचा निधी आहरीत करू नये.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. <u>कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-</u>

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्यसंस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. सदर शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात येत असलेल्या कामांना निधी वितरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

१२. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये **"नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान"** या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

**१३.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२२ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

**१४.** या लेखाशिर्षाखाली यापूर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण / महालेखापाल यांच्याकडून कोणतेही गंभीर आक्षेप नाहीत याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकाऱ्याने करावी व गंभीर आक्षेप असल्यास निधी आहरीत करु नये.

**१५.** या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ व शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ तसेच, नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-११९८/प्र.क्र.३०/न.वि.-०४, दिनांक १२ मार्च,२०१८, दिनांक ४ जून, २०१८, दिनांक ९ ऑगस्ट,२०१८, दिनांक १५ डिसेंबर, २०१८, दि.०१ जून, २०१९,दि.२६ फेब्रुवारी,२०२०, दि.११ जुन,२०२०,दि.२१ मे,२०२२, दि.२८ मार्च,२०२२ व दि. २८ एप्रिल, २०२३ अन्वये कार्यवाही करावी.

**१६.** संदर्भाधीन क्र. (१) व (२) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(श्रीकांत आंडगे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई
२. विभागीय आयुक्त, **पुणे**
३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.
४. जिल्हाधिकारी,**सातारा**
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
६. महालेखापाल, महाराष्ट्र-२,सातारा
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१०. सहायक संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,नवी मुंबई - ४०० ६१४
११. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, **सातारा**
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी,**सातारा**

१३. मुख्याधिकारी वडूज, म्हसवड, फलटण नगरपरिषद / नगरपंचायत, जि.सातारा

१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभागमंत्रालय, मुंबई

१५. कार्यासन नवि-४ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

**शासन निर्णय क्रमांक:- नपावै-२०२३/प्र.क्र.३२७(३०)/भाग-१/नवि-१६**

**दिनांक:- २९ डिसेंबर,२०२३सोबतचे विवरणपत्र**

| (अ) वडूज नगरपंचायत जि. सातारा क्षेत्रातील कामे | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामांचे नांव** | **रक्कम रु. (लक्ष)** |
| १ | वडूज नगरपंचायत क्षेत्रातील संत सावतामाळी मंदिरास सरंक्षण भिंत बांधणे. | १०.०० |
| २ | वडूज नगरपंचायत क्षेत्रातील स्वामी समर्थ मंदिराचे सुशोभीकरण करणे. | १०.०० |
| ३ | वडूज नगरपंचायत क्षेत्रातील सजगणे वस्ती शेजारी धूळदेव भिवाई मंदिरा समोर नगरपंचायत जागेत सामाजिक सभागृह बांधणे. | १०.०० |
| | **(अ) एकुण रक्कम रु.(लक्ष)** | **३०.००** |

| (ब) म्हसवड नगरपरिषद जि. सातारा क्षेत्रातील कामे | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामांचे नांव** | **रक्कम रु. (लक्ष)** |
| १ | म्हसवड नगरपरिषद क्षेत्रातील हायबती विरकर वस्ती ते शिंदे वस्ती रोड करणे | १०.०० |
| | **(ब) एकुण रक्कम रु.(लक्ष)** | १०.०० |

| (क) फलटण नगरपरिषद जि. सातारा क्षेत्रातील कामे | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **कामांचे नांव** | **रक्कम रु. (लक्ष)** |
| १ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. १ मधील कॅनॉल पासून ते मरिमाता मंदिर ते लक्ष्मीआई मंदिर रस्ता करणे. | १०.०० |
| २ | फलटण नगरपरिषद प्रभाग क्र. १ मधीलपुजारी कॉलोनी येथे अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० |
| ३ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ३ मधील पाण्याची टाकी येथे नाना-नानी पार्क सुविधा करणे. | १०.०० |
| ४ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ४ मधील साई मंदिर कमान ते निमकर कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ५ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील शेखर कांबळे घर ते बाळासाहेब कुंभार घर रस्ता करणे. | १०.०० |
| ६ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील बुवा फडतरे घर ते साळुंखे साहेब घर रस्ता करणे. | १०.०० |
| ७ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील हरी बुवा मंदिर पिछाडी कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| ८ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील लोहार गल्ली येथे रस्ता करणे. | १०.०० |
| ९ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधीलप्रमिलाताई चव्हाण हायस्कूल समोरील ग्राउंड ,मध्ये प्रेक्षक गॅलरी बैठक बांधणे व जलतरण तलाव व आधुनिक जिम साहित्यासह व्यायाम शाळा बांधणे. (तळ्यातील मैदान) | ३०.०० |
| १० | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील गणेश नगर सार्वजनिक शौचालय बांधणे. | ५.०० |
| ११ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील कुंभार टेक गोसावी वस्ती मलटण येथे सार्वजनिक शौचालय बांधणे. | १०.०० |

| | | |
|---|---|---|
| १२ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील वारकरी भवन दुसरा मजला बांधणे. | १५.०० |
| १३ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील मुस्लिम कबरस्थान सरंक्षण भिंत बांधणे. | १०.०० |
| १४ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ५ मधील श्री. राजेंद्र नागटिळे घर ते उगले घर रस्ता कार्पेट करणे. | १०.०० |
| १५ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ६ मधील खानविलकर वाडा ते क्षीरसागर घर परिसर कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| १६ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ६ मधील हरेहरेश्वर मंदिर परिसर मध्ये अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० |
| १७ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ७ मधील कुंभार टेक व खाटीक गल्ली परिसर व परीट गल्ली परिसर कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| १८ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ७ मधील उघडा मारुती मंदिर ते शिवशक्ती चौक रस्ता करणे. | १०.०० |
| १९ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र. ७ मधील मेटकरी गल्ली नगरपालिका पिछाडीस कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| २० | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.८ मधील शिवाजीनगर झोपडपट्टी अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| २१ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.८ मधीलवडार वसाहत येथे शौचालय २ युनिट बांधणे. | ५.०० |
| २२ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.८ मधील वडार वसाहत येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. | १०.०० |
| २३ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.८ मधील लतीफभाई घर ते हॉटेल विजय लंच भुयारी गटर करणे. | १०.०० |
| २४ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.९ मधील सफाई कामगार कॉलनी येथे अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे | १०.०० |
| २५ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील बालाजी मंदिर सातारा रोड फलटण येथे सुशोभीकरण करणे. | १०.०० |
| २६ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील हनुमान नगर फलटण अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| २७ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधीलअहिंसा मैदान लादीकरण करणे. | १०.०० |
| २८ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१० मधील शुक्रवार पेठ गणपती मंदिर ते सुतार घर रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| २९ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ मधील ६४८४/अ येथे अभ्यासिका बांधणे. | १५.०० |

| | | |
|---|---|---|
| ३० | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ मधील संजीवराजे नगर येथे अंतर्गत रस्ते करणे. | १०.०० |
| ३१ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ मधील महाराजा मंगल कार्यालय ते खडकनाला हिरा ओढा अंतर्गत सिमेंट पाईप गटार करणे | १०.०० |
| ३२ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ मधील विद्यानगर जग्गानाथ घर ते माधवी जाधव बंगला रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १०.०० |
| ३३ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ मधील गाडे मामा घर ते मंगी घर रस्ता करणे | १०.०० |
| ३४ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील प्रभाग क्र.१२ मधील पालखे सर घर ते करवा घर रस्ता करणे | १०.०० |
| ३५ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील छत्रपती शिवाजी पूर्णाकृती पुतळा करणे व सुशोभिकरण करणे. | ५०.०० |
| ३६ | फलटण नगरपरिषद क्षेत्रातील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर अर्ध पुतळा व सिशोभीकरण करणे. | २०.०० |
| | **(क) एकुण रक्कम रु.(लक्ष)** | **४३०.००** |
| | **(अ) ते (क) एकुण रक्कम रु.(लक्ष)** | **४७०.००** |